महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

कृषी विद्यापीठातील संचालक संशोधन विभागाने उत्पादन वाढीकडे दुर्लक्ष केल्याबाबत

(१) ६१८ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ प्रशासनाला खरीप हंगाम २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीत सोयाबीनची सरासरी केवळ एकरी ३ क्विंटलचा उतारा घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विद्यापीठातील संचालक संशोधन विभागाने इतर कार्यक्रमांची अंमलबजावणी करताना उत्पादन वाढीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (२७-११-२०२५) : (१) हे खरे नाही.

सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीची सोयाबीन पैदासकार बिजोत्पादन क्षेत्राची उत्पादकता ही प्रति एकरी अनुक्रमे ०४.०४ क्विंटल व ४.४९ क्विंटल असून, ती भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या उत्पादकतेच्या मानकाएवढी आहे.

(२) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने सोयाबीन पिकात उच्च उत्पादकता असलेले एमएयुएस ७१, एमएयुएस १५८, एमएयुएस १६२, एमएयुएस ६१२, एमएयुएस ७२५ व एमएयुएस ७३१ हे वाण विकसित केलेले असून, विद्यापीठातील मध्यवर्ती व इतर बिजोत्पादन केंद्रांच्या प्रक्षेत्रावर सोयाबीनच्या पैदासकार बियाण्याचे बिजोत्पादन घेण्यात येत आहे.

(३) सोयाबीन हे मराठवाडा विभागातील महत्त्वाचे पीक असल्याने, सोयाबीन पिकाची सरासरी उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टिकोनातून, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत मौजे धर्मापुरी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड येथे सोयाबीन संशोधन, प्रशिक्षण व प्रक्रिया उपकेंद्र स्थापन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

लाडगाव (जि.नाशिक) येथील आश्रमशाळांमध्ये बसविण्यात आलेले सोलर वॉटर हिटर संच दुरवस्था होऊन बंद असल्याबाबत

(२) ७२२ (२६-०४-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाडगाव (जि.नाशिक) येथील आदिवासी विकास विभाग संचालित शासकीय आश्रमशाळा कळवण प्रकल्पातील विद्यार्थ्यांना गरम पाणी मिळण्याकरिता बसविण्यात आलेले सोलर वॉटर हीटर संचांची दुरवस्था होऊन बंद असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय आश्रमशाळा आणि वसतीगृहात सदर सोलर वॉटर हिटरच्या दुरुस्तीअभावी निवासी विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी थंड पाणी देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागाने लाखो रुपये खर्च करुन विद्यार्थ्यांना कपडे धुण्यासाठी दिलेल्या वॉशिग मशिनचा वापर करु न देण्याची तसेच मागील दहा वर्षात सोलर वॉटर हिटरची दुरुस्ती न करण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (०१-०८-२०२५) : (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सोलर वॉटर हिटर दुरुस्तीयोग्य नसल्याने विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गॅसवर पाणी गरम करुन देण्यात येते.
(३) हे खरे नाही.
जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमातंर्गत नाविन्यपूर्ण योजनेमधून ६ शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना कपडे धुण्यासाठी वॉशिग मशीनचा पुरवठा करण्यात आलेला असून सद्यस्थितीत वापर सुरळीत सुरु आहे.
सोलर वॉटर हिटरचे आयुर्मान दहा वर्षापेक्षा अधिक झाल्याने आता ते दुरुस्तीयोग्य नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत नियुक्त कृषी मित्रांना सेवेत घेण्याबाबत

(३) ११३६ (२५-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विविध योजनांच्या निधीवर कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या कृषी मित्रांना कमी करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात कोरोनानंतर ३५० शेतकऱ्यांवर कृषी मित्रांना बेरोजगारी आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच कृषि विभागाच्या आत्मा अंतर्गत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी दोन गावे एकत्र येऊन एका शेतकरी कृषि मित्राची ग्रामसभेच्या माध्यमातून निवड करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण ७३८ शेतकरी मित्र कमी करुन त्यांचेवर बेरोजगारीची परिस्थिती ओढवल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन राज्यात कृषी मित्रांना सेवेत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (१६-०७-२०२५) : (१) व (२) केंद्र शासनाकडून कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) योजनेसाठी सन २०२१ पासून राज्याला अत्यंत कमी आवंटन मंजूर झाल्याने, माहे सप्टेंबर, २०२१ पासून शेतकरी मित्रांची निवड करण्यात आलेली नाही.
(३)होय.
(४) नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात कृषी क्षेत्रामध्ये जैविक तथा सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर करुन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याबाबत

(४) ११९९ (२६-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस मजुरांची संख्या कमी होत असून पिकांमधील तण नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना तणनाशकांचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पिकांवरील रोग व किडींच्या नियंत्रणासाठी सुद्धा कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्याने मातीची गुणवत्ता कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रासायनिक खते व औषधांच्या वापरामुळे नागरिकांच्या आहारावर विपरित परिणाम होत असून अनेक आजार उद्भवत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन जैविक तथा सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर जास्तीत जास्त करुन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (२९-०७-२०२५) :

(१) होय

(२) याबाबतचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही.

(३) व (४) नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषी विकास योजना व राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान तसेच राज्य पुरस्कृत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन या तीन योजना राबविण्यात येत आहेत.

रासायनिक खते, किटकनाशके इत्यादीचा वापर थांबविणे, जमिनीचे सेंद्रिय कर्ब वाढवून जमिनीची सुपिकता व आरोग्य सुधारणे, रसायनमुक्त, सुरक्षित, सकस व पोषणयुक्त सेंद्रिय माल उत्पादित करणे, नैसर्गिक व सेंद्रिय मालाची मुल्य साखळी विकसीत करणे, गट स्तरावर / शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावर जैव निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करणे ह्या उद्देशाने सदर योजना राबविण्यात येत आहेत.

सदर योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतावर निविष्ठा निर्मितीकरीता प्रोत्साहन देण्यात येते. तसेच विविध प्रशिक्षण, शेतकरी मेळावे, शेतीशाळा, कृषी प्रदर्शने, जनजागृती कार्यक्रम यांच्या माध्यमातून जैव निविष्ठांचा वापर करणेबाबत जनजागृती करण्यात येते.

५) प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई (जि.बीड) येथे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत लाभार्थ्यांची अपात्रता मागे घेण्याबाबत

(५) १३२३ (२६-०४-२०२५). श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत चुकीने अपात्र झालेल्या २३३४ लाभार्थ्यांची अपात्रता मागे घेण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी कृषी आयुक्तालयाला सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करुन जिल्हाधिकारी यांनी कृषी आयुक्त, पुणे यांना दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रानुसार विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांच्या पत्राच्या अनुषंगाने कृषी आयुक्तालयाने कोणती कार्यवाही केली तसेच जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी पाठविलेल्या प्रस्तावातील किती लाभार्थ्यांची अपात्रता मागे घेण्यात आली,

(३) असल्यास, महसुल आणि कृषी विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे हजारो लाभार्थी शेतकरी योजनेच्या रास्त लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वंचित शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान

वि.स. २२ (4)
सन्मान निधी योजनेंतर्गत लाभ देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :
(१) हे, अंशत: खरे आहे.
जिल्हा नोडल अधिकारी पी.एम.किसान तथा जिल्हा कृषि (अधीक्षक) अधिकारी, बीड यांनी माहे, जानेवारी २०२५ मध्ये गेवराई तालुक्यातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत चुकीने अपात्र ठरलेल्या २०५६ लाभार्थ्यांना पुन्हा पात्र करण्याबाबतचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयास सादर केला होता.
(२) कृषि आयुक्तालयास प्राप्त झालेल्या सदर प्रस्तावानुसार गेवराई तालुक्यातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत अपात्र ठरविण्यात आलेल्या २०५६ लाभार्थ्यांना पात्र ठरविण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील कामगारांना कायम करण्याबाबत

(६) १५१८ (२५-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील कामगारांना दिनांक २४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार कायम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात कृषी विद्यापीठाने शासनाकडे पाच वर्षांपासून काम करणाऱ्या मजुरांना इतर मागासवर्ग, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती व खुला प्रवर्गानुसार कायम करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राहुरी, दापोली, आणि परभणी कृषी विद्यापीठांमध्ये सन २०१५ मध्ये मोठ्या प्रमाणावर कामगारांना कायम करण्यात आले आहे, परंतु अकोला विद्यापीठातील प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीनुसार कामगारांना कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (११-०९-२०२५) : (१) होय ,
(२) कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ ,अकोला यांनी त्यांच्या दिनांक०७.०७.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे विद्यापीठाच्या आस्थापनेवर रोजंदारी तत्वावर कार्यरत असलेल्या मजूरांना सेवाजेष्ठतेनुसार कृषि विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता.
(३) हे खरे नाही,
कृषि व पदुम विभागाच्या दिनांक२४.०७.२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील कृषि विद्यापीठांमधील रोजंदारी मजुर, कुशल व अर्धकुशल कर्मचा-यांना सेवेत नियमित करण्याचा निर्णय तत्कालीन राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेण्यात आला होता. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १६.११.२०१५ नुसार इतर कृषि विद्यापीठातील कर्मचारी / रोजंदारी मजूरांप्रमाणेच, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ ,अकोला येथील २५४ रोजंदारी मजूर व कुशल अर्धकुशल कर्मचा-यांना सेवेत नियमित करण्यात आले आहे.
कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ ,अकोला यांच्या दिनांक०७.०७.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेला प्रस्ताव नियमोचित नसल्याने त्यास मान्यता देण्यात आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात हलबा समाजाकरीता आर्थिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत

(७) १६१२ (२६-०४-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास तसेच अन्य अनुसूचित जाती व जमाती मधील समाजाच्या उत्कर्षासाठी आर्थिक विकास मंडळ आणि उपमंडळांची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषतः नागपुरात असणाऱ्या अनुसूचित जमातीमधील हलबा समाजाच्या विकासासाठी आर्थिक विकास मंडळ निर्माण करण्याची घोषणा मा.आदिवासी विकास मंत्री यांनी हिवाळी अधिवेशनात केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संत श्री कोलबास्वामी हलबा आर्थिक विकास मंडळ घोषित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संत श्री कोलबास्वामी हलबा आर्थिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (२७-११-२०२५) :

(१) होय, हे खरे आहे, इतर मागासवर्गीयांकरीता- महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ.

अनुसूचित जमाती करीता- १) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक २) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, मर्या.नाशिक

(२) मागणी करण्यात आली होती.

(३) होय, हे खरे आहे, श्री.प्रविण दटके, मा.विधानसभा सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री, महोदयांकडे दिनांक१४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये श्री कोलबा स्वामी हलबा समाज आर्थिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत विनंती केली होती.

(४) अनुसूचित समुहातील जमातींचा उत्कर्ष / सर्वांगीण विकास करण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ कार्यरत असून संत श्री कोलबा स्वामी हलबा समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्राध्यापकांच्या भरतीबाबत

(८) १८५३ (०५-०५-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ९२ प्राध्यापकांच्या भरतीसाठी जाहिरात देण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियुक्ती प्रक्रिया शासनाकडून थांबविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही नियुक्ती प्रक्रिया पुन्हा सुरु केल्यानंतर जुन्या अर्ज केलेल्या उमेदवारांचा पुनश्च: विचार केला जाईल अथवा उमेदवारांना पुन्हा नव्याने अर्ज मागविण्यात येतील याबाबत उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन प्रलंबित असलेली भरती प्रक्रिया पुन्हा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१८-०८-२०२५) :

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागातील व विद्यापीठ संचलित लक्ष्मीनारायण तंत्रशास्त्र संस्थेतील एकूण ९२ शिक्षकीय पदांची एकत्र जाहिरात दिनांक१२ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संचलित, लक्ष्मीनारायण तंत्रशास्त्र संस्था, विद्यापीठातून विभक्त होऊन तिचे रुपातंर लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठात झाले आहे. दोन्ही विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा वेगवेगळा आकृतीबंध मंजूर करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही चालू असल्याने पदभरतीसंदर्भात कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

(४) दोन्ही विद्यापीठांकरिता स्वतंत्र आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर पदभरतीसंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प करण्याबाबत

(९) १८८१ (२५-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी क्षेत्रात आर्थिक नियोजन बिघडल्याने शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली असून शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आत्महत्या रोखण्यासाठी व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी नियोजनबध्द कार्यक्रम नसल्यामुळे स्वतंत्र अर्थसंकल्प करावा तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांना ५८ वर्षानंतर दरमहा पेन्शन सुरु करावी, अशी मागणी वरिष्ठ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (३०-०७-२०२५) :

(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. वरिष्ठांकडून “कृषि क्षेत्रासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प करावा व अल्पभूधारक शेतकऱ्यांना ५८ वर्षानंतर दरमहा निवृत्तीवेतन सुरु करावे” अशी लेखी मागणी/निवेदन प्राप्त झालेली नाहीत.

(३) राज्यात कृषि क्षेत्राच्या विकासासाठी नियोजनबध्द कार्यक्रम राबविले जातात. त्यासाठी केंद्र शासनाचे देखील पाठबळ मिळते. कृषि क्षेत्राच्या विकासासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात येते. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना इतर शेतकऱ्यांच्या तुलनेत वाढीव दराने अनुदान देय आहे.

प्रधानमंत्री किसान मानधन योजनेत अल्प भूधारक शेतकऱ्यांना ६० वर्षानंतर दरमहा रु. ३०००/- निवृत्तीवेतन मिळणेबाबत योजना असून १८ ते ४० वर्षे वयोगटातील शेतकरी रु. ५५ ते रु. २०० मासिक हप्ता भरुन सहभागी होऊ शकतात. सध्या योजनेत ८०,४६६ शेतकऱ्यांनी नोंद केली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

भोकर येथील आदिवासी मुला-मुलींच्या वसतीगृहासाठी जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत

(१०) २१४३ (२६-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) येथील आदिवासी मुला-मुलींच्या वसतीगृहासाठी शासकीय वन जमिन हस्तांतरित करण्यास मान्यता मिळण्याकरीता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती यांनी त्यांच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २०२४ च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने वसतीगृहाअभावी आदिवासी मुला-मुलींच्या वास्तव्याचा प्रश्न गंभीर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात प्रलंबित प्रस्तावावर तत्काळ कार्यवाही करुन प्रशासकीय मान्यता देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (२२-०७-२०२५) :

(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

भोकर जि.नांदेड येथे ७५-मुले व ७५-मुली विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वसतिगृह सन २००४ पासून भाड्याच्या इमारतीत कार्यरत असून, सदरील वसतिगृहात सर्व सोई-सुविधा उपलब्ध आहेत.

(३) व (४)

भोकर येथे आदिवासी मुलींकरिता वसतीगृहाच्या बांधकामासाठी जागा प्राप्त झाल्यानंतरच सदर कामाचे प्राथमिक अंदाजपत्रक मान्यतेकरिता अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर या कार्यालयास सादर करण्याबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर यांनी दिनांक १६/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवसानिमित्त उपक्रम राबविण्याबाबत.

(११) २१९७ (०५-०५-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संयुक्त राष्ट्रसंघ, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, अल्पसंख्याक विकास विभाग, राज्य अल्पसंख्याक आयोग या सर्वांचे शासन परिपत्रकानुसार दरवर्षी दिनांक १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक हक्क दिवस असूनही जिल्हाधिकारी कार्यालयात त्याबाबत कोणतेही उपक्रम राबविले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दिनादिवशी विविध उपक्रम राबवून शासन योजनांची जनजागृती करुन समाजातील विविध समस्या सोडविणे ही आयोग व सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी यांची जबाबदारीने शासन निर्देशाचे पालन केले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक दिन साजरा करण्याबाबत शासनाकडून संबंधितांना अवगत करणे, मागील ३ वर्षांचे सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतचे अहवाल मागविण्यात यावेत तसेच दिन साजरा न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी अल्पसंख्याक दिन साजरा करण्यासंदर्भात शासनाकडे वारंवार मागणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी दिनांक १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक दिन साजरा करून विविध उपक्रम राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

वि.स. २२ (8)

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (१६-०७-२०२५) :(१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) हे खरे आहे.

(५) प्रतिवर्षी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत दिनांक १८ डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून पाळण्यात येतो. याकरिता विविध कार्यक्रमाचे जिल्हास्तरावर आयोजन करण्याबाबत सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांना आयोगामार्फत कळविण्यात येते. तसेच शासन स्तरावरून देखील सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते. याकरिता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास प्रतिवर्षी रू.१०.०० लाखाच्या मर्यादेत खर्च करण्यास दिनांक३०/१२/२०१५ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून जिल्हास्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात प्रधानमंत्री कृषी पिक विमा योजनेच्या उत्पन्नावर आधारित पिक भावसंरक्षण विमा योजना राबविण्याबाबत

(१२) २२३८ (२५-०४-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर), डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री कृषी पिक विमा योजनेची व्याप्ती वाढवून उत्पन्नावर आधारित पिक भावसंरक्षण विमा योजना राबविण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे लेखी पत्राद्वारे दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची दखल घेऊन अभ्यास गट स्थापन करण्याबाबतचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच प्रधानमंत्री पिक विमा या योजनेच्या तुलनेत शासनाच्या माध्यमातून उत्पन्नावर आधारित पिक भावसंरक्षण विमा योजना सुरु केल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यानुषंगाने अवर सचिव (कृषी) यांनी कृषी आयुक्त (पुणे) यांना पिक भावसंरक्षण विमा योजना राबविण्याबाबतचे अभिप्राय तात्काळ दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्राद्वारे सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त अभिप्राय कृषी आयुक्त (पुणे) यांनी शासनाकडे पाठविण्यात आला आहे काय तसेच उत्पन्नावर आधारित पिक भावसंरक्षण विमा योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :

(१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) राज्यातील अधिसूचित क्षेत्रातील, अधिसूचित पीकांसाठी, उत्पादनावर आधारीत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना, खरीप हंगाम, २०२५ व रब्बी हंगाम, २०२५-२६ करिता राबविण्यास राज्य शासनाने दिनांक२४ जून, २०२५ च्या शासन निर्णयाव्दारे मान्यता दिली आहे. पीक भाव संरक्षण देण्याची बाब कृषि विभागाच्या अखत्यारित येत नाही.

(६) प्रश्न उदभवत नाही.

राज्यात कृषी गुणनियंत्रण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

(१३) २२५१ (२५-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी गुणनियंत्रण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचा गैरकारभार व गैरव्यवहार तसेच विविध कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्या व विक्री केंद्रातील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला असून अनेक मोठ्या अधिकाऱ्यांच्या स्वमालकीच्या कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्या व विक्रीकेंद्रे त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आस्तवाल ॲग्रो केमिकल्स, व्ही जोशी अग्रो केमिकल्स मुंबई, नाकोडा केमिकल्स पुणे, न्युट्रोफिल्ड क्रॉप नाशिक, एलटीफर्टी पुणे, फर्टीन ॲग्रो पुणे, कॉइनेज एक्झीम प्रा.लि., एव्हरग्रीन मायक्रोन्युट्रीयन्टस पुणे या कंपन्यांमध्ये काही अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याबाबत तक्रारी दिनांक २१ ऑगस्ट, २०२० व ६ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त कंपन्यांच्या नावावर वॉटरसोल्यूबल खते आयात / निर्यात केल्याबाबत दाखविणारी डीसीएल कंपनीसुद्धा काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मालकीची आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन केलेल्या तक्रारीबाबत दखल घेवून कृषी विभागातील अधिकारी यांची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (११-०९-२०२५) : (१) सदर विषयाबाबत दिनांक ११/३/२०२५, दिनांक १५/०४/२०२५ व दिनांक १६/०५/२०२५ रोजीचे तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(२) दिनांक ११/०१/२०२२ व दिनांक २१/०८/२०२० रोजी कृषी खात्यातील गुणनियंत्रण विभागातील अनागोंदी कारभाराची व अधिकारी / कर्मचारी यांच्या विविध कृषीनिविष्ठा उत्पादक कंपन्या व विक्री केंद्रामधील सहभागाची चौकशी होणेबाबतचा एकत्रित तक्रार अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त झाले आहेत. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने संबंधित अर्जदार यांचेशी संपर्क केला असता त्यांनी सदर अर्ज केला नसल्याचे सांगून चौकशीस हजर झाले नाही. तसेच दुसरा अर्जदार यांचा शोध घेण्याबाबत व संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा नाव व पत्ता अपूर्ण असल्याने संपर्क झालेला नाही. यावरुन नमुद प्रकरणातील तक्रार अर्ज खोटया / अपुर्ण नावांने केलेले असल्याचे दिसुन आले आहे. करीता नमूद अर्ज निनावी सदराखाली दप्तरी दाखल करण्यात आले आहे, असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी दिनांक ११/०३/२०२५, दिनांक १५/०४/२०२५, दिनांक ०२/०५/२०२५ व दिनांक १६/०५/२०२५ च्या तक्रार अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात कृषि आयुक्तालयाकडून दिनांक ०९/०६/२०२५ रोजी प्राथमिक चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

सदर प्राथमिक चौकशी अहवाल, आयुक्त (कृषि) यांनी केलेल्या शिफारशी आणि दरम्यान प्राप्त झालेल्या दिनांक २७/०५/२०२५ व २८/०५/२०२५ च्या तक्रारी अर्जांत उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याकरीता प्रस्ताव गृह विभागास दिनांक२४/०६/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे.

तसेच सदर तक्रार प्रकरणाची व्याप्ती पाहता व चौकशी अधिका-यांची शिफारशी लक्षात घेता कृषि आयुक्तालयाकडून प्राप्त शिफारशीनुसार शासन आदेश दिनांक २४ जून, २०२५ अन्वये सदर तक्रार प्रकरणी प्राथमिक चौकशीसाठी विशेष चौकशी अधिकारी म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले डॉ. उमाकांत दांगट यांची नियुक्ती करण्यात आली असून चौकशीची कार्यवाही कार्यान्वित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कृषी व्यापार संघावर नेमण्यात येणाऱ्या 'व्यवस्थापक संचालक' पदाबाबत

(१४) २२६५ (२५-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील

वि.स. २२ (10)

काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांच्या कृषी व्यापार संघाच्या मानधनावर ‘व्यवस्थापक संचालक’ हे पद करार पद्धतीने शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या कृषी संचालक या दर्जातून भरण्याची प्रक्रिया रद्द करण्याची तक्रार दिनांक २८ व २९ जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास श्रीमती व्ही.राधा, प्रधान सचिव (कृषी) यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीबाबत शासनाने दखल घेतली नसून या पदावर तत्कालीन कृषी संचालक श्री.दशरथ तांभाळे यांची नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच श्री.तांभाळे हे विभागीय कृषी संचालक म्हणुन कोल्हापूर येथे कार्यरत असतानाही आत्मा विभागाच्या संचालक पदाचा अतिरिक्त पदभार घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात त्यांचे विरोधात तत्कालीन सचिव व आयुक्त (कृषी), महाराष्ट्र शासन यांच्याकडे तक्रार देऊनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदर तक्रारीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :

(१) हे खरे आहे,

राज्यात शेतक-यांच्या कृषी व्यापार संघाच्या मानधनावर व्यवस्थापक संचालक हे पद करार पध्दतीने शासकीय सेवेतुन निवृत्त झालेल्या कृषी संचालक या दर्जातून भरण्याची प्रक्रिया रद्द करण्याची तक्रार कृषी आयुक्तालयास दिनांक२९.०७.२०२४ रोजी प्राप्त झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

विमा कंपनीच्या पोर्टलवर केळी या फळपिकाचा विमा भरण्याचा पर्याय उपलब्ध नसल्याबाबत

(१५) ३०२७ (२७-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुनर्रचित हवामान आधारित ‘फळ पिक विमा योजना’-आंबिया बहार (२०२४-२५) ही योजना केळी फळ पिकासह इतर ०८ फळ पिकांसाठी ३० जिल्ह्यांत राबविण्यात येत असून त्यात बीड जिल्ह्याचा समावेश करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच होळ (ता.केज, जि.बीड) येथील महसूल मंडळाचा विमा कंपनीच्या पोर्टलवर केळी या फळपिकाचा विमा भरण्याचा पर्याय दाखवण्यात येत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा कंपनीच्या पोर्टलवर केळी फळ पिकाचा विमा भरण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्याबाबतची तीव्र मागणी शेतकरी वर्गातून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन विमा कंपनीच्या पोर्टलवर केळी या फळपिकाचा विमा भरण्याचा पर्याय शेतकऱ्यांकरिता उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :

(१), (२) व (३) होय,

(४) सन २०२५-२६ पासून बीड जिल्हयातील होळ हे महसूल मंडळ केळी फळपीक विम्यासाठी अधिसूचित करण्यात आले आहे. त्यानुसार, आंबिया बहार सन २०२५-२६ पासून होळ या महसूल मंडळातील शेतकरी अर्जदारांना केळी या

फळपिकासाठी विमा सहभाग नोंदविता येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मराठवाड्यातील कृषी विद्यापीठाद्वारे संशोधनावर भर देण्याबाबत

(१६) ३१७६ (२६-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात पाणी उपलब्ध नसल्यामुळे शेती नापीक होण्याचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाकडे शेकडो एकर जमीन पडीक असूनही या क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने कोणतेही प्रयत्न वा संशोधन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याच्या एकूण क्षेत्रांपैकी २१% क्षेत्र असणाऱ्या मराठवाड्यामध्ये कृषि क्षेत्र टिकवून देण्यासाठी शासनाने सिंचन अनुशेषासह इतर कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी संशोधन आणि तदनुषंगिक कामांसाठी पुरेसा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (२७-११-२०२५) :
(१) व (२) वसंतराव नाईक मराठवाडा, परभणी अंतर्गत एकूण १७ संशोधन केंद्रे, २३ अखिल भारतीय समन्वयीत संशोधन केंद्रात ज्वारी, बाजरी,तूर, सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, भुईमूग, करडई या पीकांसोबतच ऊस, भाजीपाला वर्गीय पीके, मोसंबी, डाळिंब, सिताफळ इ. फळपिके यावर संशोधन करण्यात येत आहे. परभणी कृषि विद्यापीठाने मागील ५० वर्षात विविध पिकांचे सुमारे १५८ उन्नत वाण, पीक व्यवस्थापन, पीक संरक्षण, काढणी पश्चात हाताळणी व मुल्यवर्धन इ. बाबतीत एकूण ११४६ शिफारशी दिल्या आहेत. तसेच, एकूण ५६ कृषि यंत्रे व अवजारे विकसित केली आहेत.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने सन २०२१-२२ या वर्षी सामाजिक वनीकरण विभाग, परभणी यांच्याद्वारे मध्यवर्ती प्रक्षेत्राच्या ४० हेक्टर क्षेत्रावर वनीकरणाचा कार्यक्रम राबवून वृक्ष लागवड केली आहे. तसेच, २०२२-२३ या वर्षात पैदासफार बिजोत्पादन प्रक्षेत्र, खानापुर विभागाच्या ३२.१७ हेक्टर प्रक्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आली आहे.

परभणी कृषि विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रक्षेत्रातील जमीन खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामात लागवडीखाली आणण्यात येते.
(३) व(४) जून,१९९४ मध्ये मराठवाड्यात अनुशेष ४.३१ लक्ष हेक्टर होता व जून २०२४ अखेर ४.२४ लक्ष हेक्टर (९९%) इतका अनुशेष हिंगोली जिल्ह्यातील असून सदर अनुशेष जून २०२७ पर्यंत दूर करण्याचे राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाचे नियोजन आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी विद्यापीठास सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून मुख्यमंत्री संशोधन निधीमधून बीयाणे प्रयोगशाळा, हवामान प्रयोगशाळा, जैवतंत्रज्ञान प्रयोगशाळा, जैविक औषधी निर्मिती प्रयोगशाळा, माती परिक्षण प्रयोगशाळा, जैविक खते निर्मिती प्रयोगशाळा, फळ संशोधन व प्रक्रीया प्रयोगशाळा इत्यादी करिता शासनाकडून वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील शेकडो विमाधारक आंबा बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(१७) ३२९८ (२७-०४-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील शेकडो विमाधारक आंबा बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न मिळाल्याने त्यांनी जिल्हाधिकारी व कृषी कार्यालयावर आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विमाधारक आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई तातडीने देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :

(१) होय,

(२) आंबिया बहार सन २०२३-२४ मध्ये पालघर जिल्हयातील ३३६३ शेतकऱ्यांनी आंबा या फळपीकासाठी १९२५ हेक्टर क्षेत्रावर सहभाग नोंदवला होता. या सर्वच शेतकऱ्यांना एकूण रु.१४,१७,००,८९८/- इतकी नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

लातूर जिल्ह्यातील कृषी विभागात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत हस्तक्षेप होत असल्याबाबत

(१८) ३३४८ (२७-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील कृषी विभागात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत हस्तक्षेप होत असल्याच्या तक्रारी येऊन अनुभवी कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत असून राजकीय शिफारसीवर नवीन उमेदवारांना प्राधान्य दिले जात असल्यामुळे अनुभवी कर्मचारी बेरोजगार होण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कृषी विभागात कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने होण्याबाबत तसेच भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये याकरीता दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कायर्वाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (२४-०७-२०२५) :

(१) व (२) हे खरे नाही.

लातूर विभागांतर्गत लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी व हिंगोली जिल्हयामध्ये विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणी करीता विविध मंजूर पदासाठी आवश्यक कंत्राटी मनुष्यबळाची सेवा, नोंदणीकृत मनुष्यबळ पुरवठादार संस्थांकडून उपलब्ध करुन घेतली जाते, सदरील कंत्राटी मनुष्यबळाची सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ अन्वये गव्हर्नमेंट ई- मार्केटप्लेस (GeM Portal) द्वारे पात्र बाहय एजन्सीची निवड करण्यात येते.

आवश्यक कंत्राटी मनुष्यबळाची नियुक्तीचे सर्व अधिकार हे बाहय संस्थेचे आहेत. या कंत्राटी मनुष्यबळाची नियुक्ती विभागीय कृषि सहसंचालक किंवा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयामार्फत केली जात नाही.

विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेतर्गत कृषि आयुक्तालयाकडून मंजूर झालेल्या विविध कंत्राटी पदांची लातूर जिल्हयामध्ये नियुक्ती करण्यासाठी विभागस्तरावरुन बाहय संस्थेला आदेशित करण्यात आले आहे. नियुक्ती देत असताना शक्यतो अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे असे आदेशामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. नियुक्ती

संदर्भात कृषि विभागामार्फत कसलाही हस्तक्षेप किंवा शिफारशी करण्यात आलेल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अल्पसंख्याक विकास विभागाचा तब्बल ८५ टक्के निधी अद्यापही अखर्चित असल्याबाबत

(१९) ३३६६ (०५-०५-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी निधीची तरतूद करण्यात येते, हे खरे आहे काय़, तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये (नोव्हेंबर २०२४ पर्यंत) विभागासाठी ९४२.६९ कोटी रुपयांची तरतूद असूनही फक्त १४२.६५ कोटी रुपयांचा खर्च झाला असून उर्वरित ८००.०४ कोटी रुपये अखर्चित राहिले असल्याचे, व त्यामुळे उद्दिष्टित विकासावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिनांक २१जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय़,

(२) असल्यास, राज्याच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद असूनही अल्पसंख्याक विकास विभागाने फक्त २२.७२ टक्के इतकाच निधी खर्च केला असल्याचे, तसेच वित्त विभागाने घेतलेल्या आढाव्यात सदर बाब उघडकीस आल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासावर प्रतिकूल परिणाम होत असून, मंजूर निधीपैकी अत्यल्प टक्केवारीत खर्च होण्याची कारणे कोणती असून याबाबत शासनाने चौकशी सुरू केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत कोणती कारणे आढळून आली आहेत, आणि संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे किंवा करण्यात येत आहे,नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. माणिकराव कोकाटे (२२-०८-२०२५) :

(१) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील एकूण रु. ८१२.०० कोटी मंजूर तरतुदीपैकी माहे नोव्हेंबर २०२४ अखेर रु. १०४.३२ कोटी रुपये खर्च झाला होता. मात्र मार्च २०२५ अखेरपर्यंत एकूण तरतुदीपैकी रु.६०२.९२ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

(२) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील तरतुदीपैकी माहे डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत १९.३७ टक्के निधी तर मार्च २०२५ अखेरपर्यंत ७४.२५ टक्के निधी खर्च झाला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यातील कृषी विभागातील विविध रिक्त पदांबाबत

(२०) ३५७८ (२७-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील कृषी विभागातील कृषी उपसंचालक, तालुका कृषी अधिकारी तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागातील विविध पदे भरण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांच्या विविध योजना राबविण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानसार उक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :

(१) हे अंशत: खरे आहे.

परभणी जिल्ह्यातील कृषि विभागाची एकूण ६४४ पदे मंजूर असून त्यापैकी ४८३ पदे भरलेली आहेत व १६१ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी, गट क व ड संवर्गातील आरेखक-१, अनुरेखक-४५, शिपाई-४०, स्वच्छक-२, वाहनचालक-९, प्रयोगशाळा सहायक-३, टिलर ऑपरेटर-१ व रोपमळा मदतनीस-१ अशा एकूण १०२ रिक्त पदांच्या भरतीस निर्बंध आहेत. सदर १०२ रिक्त पदे वगळता परभणी जिल्ह्यात एकूण ५९ पदे रिक्त आहेत. म्हणजेच पदभरतीस निर्बंध असलेली पदे वगळून जवळपास ९० टक्के पदे भरलेली आहेत व १० टक्के पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

सदरील रिक्त पदांचा अतिरिक्त पदभार नजीकच्या अधिकारी/कर्मचा-यांकडे सोपवून शेतकऱ्यांच्या योजना राबविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) परभणी जिल्ह्यातील कृषि विभागातील रिक्त पदे सरळसेवेने/पदोन्नतीने/बदलीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली (जि.चंद्रपूर) येथे कृषीभवन बांधकामाच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत

(२१) ३७४३ (२५-०४-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली (जि.चंद्रपूर) येथे कृषीभवन बांधकाम करण्यासाठी जिल्हा कृषी अधिक्षक, कृषी विभाग चंद्रपूर यांनी रितसर प्रस्ताव तयार करुन कृषी विभाग, मंत्रालय यांच्याकडे निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव कक्ष अधिकारी, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्तावास तातडीने निधीसह तसेच प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (१८-०९-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक०१.१२.२०२३ च्या पत्रान्वये बांधकाम प्रस्तावित असलेल्या जागा कृषि विभागाच्या नावे नसल्यामुळे, जागा विभागाच्या नावे करणेबाबत आयुक्त (कृषि) यांना कळविण्यात आले आहे. आयुक्त कार्यालयाकडून विभागीय कृषि सहसंचालक नागपूर व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. ब्रम्हपुरी व सावली येथील कृषि भवन बांधकामाकरीता जमीन कृषि विभागाच्या नावावर करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सिंदेवाही येथील जागा कृषि विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली असून, याबाबतचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडून शासनास प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

दरम्यान श्री. विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी त्यांच्या दिनांक २८.०४.२०२५ च्या पत्रान्वये ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर येथील कृषि भवनासाठी प्रस्तावित असलेल्या जागेऐवजी इतर सरकारी जागेचा प्रस्ताव मागविणेची विनंती विभागास केली आहे. त्यानुसार आयुक्त (कृषि) यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर तसेच जागा अंतिम झाल्यावर प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. तद्नंतर निधी अर्थसंकल्पित करणेबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

एरंडोल (जि.जळगाव) येथील कृषी विभागातील विविध पदे रिक्त असल्याबाबत

(२२) ३८७१ (२७-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल (जि.जळगाव) येथील कृषी विभागातील विविध संवर्गातील एकूण मंजूर ५० पदांपैकी २२ पदे अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (१८-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

एंरडोल जि. जळगांव तालुक्यात ५० पदे मंजूर आहेत. सद्य:स्थितीत विविध संवर्गातील १७ पदे रिक्त आहेत.

(२) नाशिक विभागाच्या कृषि सेवक भरती २०२३ च्या अनुषंगाने ३३६ पदांची (पेसा क्षेत्र १४७ व नॉन पेसा क्षेत्र १८९ पदे) भरती प्रक्रिया चालू असून एरंडोल तालुका कृषि कार्यालयात ६ कृषि सेवक भरती करण्यात आलेली आहे.

दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार गट-ड व वाहनचालक संवर्ग पदभरतीस निर्बंध आहेत. त्यामुळे गट-ड संवर्गाची २ व वाहन चालक संवर्गाचे १ पद भरण्यात आलेले नाही. अनुरेखक संवर्ग व्यपगत संवर्ग असल्याने त्या संवर्गातील ४ पदे भरण्यात येणार नाहीत. लिपीक संवर्गातील पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र कृषी सेवा गट ब, कनिष्ठ संवर्गातील पदे भरण्याकरीता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाविण्यासाठी प्रस्ताव वित्त विभागाकडील उप समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड शहरामध्ये अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी अद्ययावत वसतीगृह बांधण्याबाबत

(२३) ३८८५ (०५-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील अल्पसंख्याक समाजाची अडीच लाख ६८ हजार इतकी लोकसंख्या असून अल्पसंख्याक समाजाच्या जवळपास २५ संस्था असून त्यामध्ये इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये २४०० पेक्षा अधिक तर इयत्ता ११ वी ते १२ वी मध्ये ९०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड शहरांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी अद्ययावत वसतीगृह नसल्यामुळे सन २०२१ पासून नागरिक सतत शासनाकडे वारंवार मागणी करीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील काही शहरांमध्ये बांधण्यात येत असलेल्या वस्तीगृहांचे बांधकाम संथगतीने सुरु असून,वस्तीगृहातील प्रवेशात मोठया प्रमाणात अनियमितता असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृह बांधकामासाठी तत्कालीन अल्पसंख्याक विकास मंत्री यांनी, बांधकामासाठी सुयोग्य जागा सुचवून बांधकाम करण्याचे आदेश दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिलेले असताना त्याबाबतचा अहवाल अद्यापही शासनाकडे पाठविण्यात आलेला नसल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासकीय वसतीगृहाअभावी मुलींचे होणारे शैक्षणिक नुकसान लक्षात घेता, वसतीगृह उभारण्यासह शासनाकडे अद्याप अहवाल सादर न करणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (१६-०७-२०२५) :(१) व (२) होय , खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय , खरे आहे.

(५) व (६) बीड शहरात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहाच्या बांधकामासाठी सुचविण्यात आलेली जागा बीड नगर परिषदेची असल्याने सदर जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने दिनांक२५.११.२०२१ रोजी महसूल विभागास सादर केल्याचे कळविले होते. तथापि याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्याची नोंद आढळून आली नसल्याचे महसुल विभागाने कळविल्याने पुनःश्च प्रस्ताव महसुल विभागास सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक२१.०२.२०२५ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

जळगांव जिल्ह्यात केळी उत्पादकांसाठी केळी प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबत

(२४) ३९७१ (२७-०४-२०२५). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर, रावेर, बोदवड, यावल, भुसावळ व जामनेर येथे केळी हे मुख्य पिक असल्याने येथील केळी पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून उत्पादकांच्या मदतीकरिता कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे केळी संशोधन व तंत्रज्ञान प्रसार केंद्र स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मा.कृषी मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या ठिकाणी केळी प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार संबंधित अधिकारी वा संसदीय आयुधांमार्फत मुद्दा उपस्थित करुनही शासनाने अद्यापही कोणताच निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केळी उत्पादकांसाठी केळी प्रक्रिया उद्योग उभारण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावावर निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (३०-०७-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जळगाव येथे अखिल भारतीय समन्वयीत केळी संशोधन केंद्र कार्यरत आहे.

जळगाव हे जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असून ते रस्ते, रेल्वे मार्गाने जोडलेले आहे. त्यामुळे जळगाव हे उत्तम दळणवळण असलेले स्थान आहे.

जळगाव येथील केळी संशोधन केंद्रामार्फत जळगाव जिल्ह्यातील तसेच, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या केळी विषयक समस्यांचे निराकारण करून योग्य सल्ला व मार्गदर्शन दिले जात आहे. यास्तव, कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे केळी संशोधन व तंत्रज्ञान प्रसार केंद्र स्थापन करण्याची बाब विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील साखर कारखान्यातील कामगारांच्या थकित वेतन व अन्य मागण्यांबाबत

(२५) ४०३३ (०५-०५-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कामगारांचे तब्बल २५ महिन्यांचे वेतन थकित असल्याने प्रलंबित वेतन आणि अन्य मागण्यांसाठी कामगारांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२४ पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे पुणे येथे संपन्न झालेल्या बैठकीत साखर उद्योगातील नोंदणीकृत व मान्यताप्राप्त मंडळाच्या महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी अध्यक्ष/सचिव यांनी इशारा दिला असल्याचे दिनांक २ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्यातील साखर उद्योग व जोडधंद्यातील सर्व कामगारांच्या वेतनवाढीच्या कराराची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी संपल्याने वेतनवाढीच्या मागण्यांबाबतच्या मंडळाने मा. तत्कालीन मुख्यमंत्री, सहकार

मंत्री, कामगार मंत्री, साखर आयुक्त, राज्य सहकारी साखर कारखाना संघ इत्यादींना दिनांक १० फेब्रुवारी, २०२४ रोजी निवेदनेद्वारे कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागण्यांचा मसुदा दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी पाठविण्यात आला होता परंतु ११ महिन्यांचा कालावधी होऊनही त्यास प्रतिसाद न मिळल्याने कामगारांच्या कुटुंबियांना उपासमारीची वेळ आलेली असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कामगारांना वेतनवाढ देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

ॲड. आकाश फुंडकर (२३-०६-२०२५) :

(१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ यांच्या दिनांक२८.११.२०२४ रोजीच्या बेमुदत संपाच्या नोटिशीद्वारे, सांगली येथे राज्यव्यापी संघटनांच्या झालेल्या बैठकीत दिनांक१६.१२.२०२४ रोजी पासून महाराष्ट्र राज्यातील साखर कामगार कामबंद बेमुदत संपावर जाणार असल्याचे मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले होते.

सदर नोटीशीव्दारे, साखर कामगारांचे वेतन व सेवाशर्तीबाबत मागील त्रिपक्षीय समितीने केलेला करार दिनांक३१.०३.२०२४ रोजी संपुष्टात आल्यामुळे वेतन व सेवाशर्तीबाबत नवीन त्रिपक्षीय समिती स्थापन करण्याची मागणी तसेच थकीत वेतन व इतर मागण्या केलेल्या होत्या.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ यांनी दिनांक २७.०२.२०२४ रोजी साखर कामगारांच्या मागण्यांचा मसुदा मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेला आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्यातील साखर कारखाना कामगारांच्या मागण्यांबाबत विचार करण्यासाठी दिनांक११.१२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये त्रिपक्षीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(४) त्रिपक्षीय समितीच्या दिनांक१५.०१.२०२५ व दिनांक१२.०२.२०२५ रोजी झालेल्या बैठकांमध्ये साखर कारखान्यातील कामगारांच्या मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा सुरु असून समितीच्या पुढील बैठकीत सदर विषय घेण्याचे मा.अध्यक्ष यांनी निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात सहवीज निर्मिती योजनेकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

(२६) ४२४४ (२६-०४-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहवीज निर्मितीत उत्तम कामगिरी होण्याची शक्यता असतानाही या योजनेकडे दुर्लक्ष होत असल्याने सन २०२० मध्ये सहवीज निर्मितीचे पहिले धोरण जाहीर केले त्यानुसार २०२५ पर्यंत १३५० मेगावॅट सहवीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते मात्र आतापर्यंत केवळ ३५० मेगावॅटचे सहवीज खरेदी करार करण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातही प्रत्यक्षात २७० मेगावॅट इतक्या विजेचे खरेदी झाली त्यामुळे सहवीज निर्मितीचे धोरण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२५ पर्यंत राज्यात १३५० मेगावॅट सहवीज निर्मितीचे ठरवून दिलेले उद्दिष्ट शासनाने पूर्ण केले

नसल्याने साखर कारखान्यांनी ही त्याकडे दुर्लक्ष केले आहे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने २०२० मध्ये सहवीज निर्मितीचे पहिले धोरण जाहीर केले असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण २०२० अंतर्गत ऊसाच्या चिपाडावर आधारीत/कृषी अवशेषांवर आधारीत सहवीज निर्मिती प्रकल्पांकरीता सन २०२७ पर्यंत १३५० मेगावॅट इतके उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यानुसार महावितरण कंपनीने एप्रिल २०२५ पर्यंत ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्पांसोबत एकूण ५०२ मे.वॅ. क्षमतेचे सामंजस्य वीज खरेदी करार केले आहेत.

(२) व(३) हे खरे नाही.

महावितरण कंपनीने सहवीज निर्मिती प्रकल्पांसोबत केलेल्या एकूण ५०२ मे.वॅट. क्षमतेच्या वीज खरेदी करारापैकी ४०१ मे.वॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यन्वित झाले असून महावितरण कंपनी सदर प्रकल्पांमधून वीज खरेदी करत आहे.

(४) अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० नुसार महाऊर्जामार्फत अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांची नोंदणी जलद गतीने करण्याकरिता "सिंगल विंडो पोर्टल" सुरू करण्यात आले आहे.

दिनांक३०.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० अंतर्गत प्रोत्साहनात्मक सुधारणा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्पातून निर्माण झालेल्या विजेचा स्वयंवापरासाठी उपयोग केल्यास प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षांपर्यंत विद्युत शुल्क माफ करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना क्रीडा सोयी -सुविधा पुरविण्याबाबत

(२७) ४२८३ (२९-०४-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठ ही देशामधील नामांकित विद्यापीठ असून विद्यापीठामध्ये क्रीडा सोयी - सुविधांची अत्यंत दयनीय परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या क्रीडा प्रकारांचा सराव करत असताना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना क्रीडा सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१४-०७-२०२५) :

(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) विद्यापीठ स्तरांवर विद्यार्थी/खेळाडूना वेळोवेळी क्रीडा सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सासन रामापूर (जि.अमरावती) येथील आदिवासींचा प्राचीन इतिहास व दुर्मिळ परंपरेबाबत

(२८) ४२९१ (२७-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा

वि.स. २२ (19)

खुलासा करतील काय :-

(१) सासन रामापूर (जि.अमरावती) येथील आदिवासी कोळी महादेव बांधवांचे प्राचीन इतिहास व पुरातन परंपरेबाबत जिल्ह्यातील दुर्मिळ पुस्तिका (ग्रेझेटर) वा अन्य शासकीय दस्तऐवजांमध्ये नोंद घेण्याबाबत तसेच तेथील त्या कुटुंबातून होत असलेला शिवपार्वती लग्न सोहळा, या आदिवासी चालीरीतीबाबत शासनाकडे नोंद घ्यावी या संबंधाने लोकप्रतिनिधी विभागीय आयुक्त (अमरावती) यांचे कार्यालयाचे पत्र अवर सचिव, आदिवासी विभाग (मुंबई) यांना दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आदिवासी विकास मंत्री महोदयांकडे माहे जानेवारी, २००५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीनुसार नोंद घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (१८-०८-२०२५) :

(१) व (२) हे खरे आहे.

(३) अनुसूचित जाती व जनजाती आदेश (सुधारणा) अधिनियम १९७६ अन्वये ४५ जमाती समुह अंतर्गत १८१ अनुसूचित जमाती घोषित करण्यात आलेल्या आहेत. सदर प्रत्येक अनुसूचित जमातींची प्रथा, परंपरा, चालीरीती व विविध सांस्कृतिक बाबी भिन्न आहेत या सर्व बाबींचा अभ्यास होणे आवश्यक असल्याने केंद्र शासनाच्या सहाय्यातून ४५ जमाती समुहांचा मानवंश शास्त्रीय अभ्यास प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये कोळी महादेव जमातींचा अभ्यास देखिल समाविष्ट असून सदर मानववंश अभ्यास प्रकल्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे मार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पंतप्रधान खरीप पिक विमा योजनेत "ई-पिक पाहणी" बंधनकारक करण्याबाबत

(२९) ४३३५ (२५-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंतप्रधान खरीप पिक विमा योजनेत "ई-पिक" पाहणी बंधनकारक करण्याची महत्त्वपूर्ण शिफारस राज्य समितीने केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंदाच्या खरीप व रब्बी हंगामात केवळ ६० तर १५ टक्के क्षेत्रावरील पिकांची नोंद ई-पिक पाहणीद्वारे झाल्यामुळे पिक पाहणीचे बंधन व पेरणीचे प्रत्यक्ष प्रमाण शासनाला समजून कृषी धोरण ठरवून "ई-पिक पाहणी" करणे सहज शक्य होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन "ई-पिक पाहणी" बंधनकारक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :(१) होय, पीक विमा आणि पीक पाहणी दावे निकाली काढण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी या उद्देशाने ई-पीक पाहणी बंधनकारक करण्याची आयुक्त, कृषि यांच्या अध्यक्षतेखालील सुधारणा समितीने शिफारस केली आहे.

(२) व (३) राज्यातील अधिसूचित क्षेत्रातील, अधिसूचित पीकांसाठी, उत्पादनावर आधारीत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना, खरीप हंगाम, २०२५ व रब्बी हंगाम, २०२५-२६ करिता राबविण्यास राज्य शासनाने दिनांक२४ जून, २०२५ च्या शासन निर्णयाव्दारे मान्यता दिली आहे. याअंतर्गत पीक विमा नुकसान भरपाईसाठी ई-पीक पाहणी करिता पीकांची नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

वि.स. २२ (20)

(४) प्रश्न उदभवत नाही.

कृषी आयुक्तालय (पुणे) अंतर्गत कृषी अभियांत्रिकी संचालनालयाची स्थापना करण्याबाबत

(३०) ४८३८ (२७-०४-२०२५). : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी औद्योगिकरण वाढीसाठी कृषी आयुक्तालय (पुणे) अंतर्गत कृषी अभियांत्रिकी संचालनालयाची स्थापना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कृषी अभियांत्रिकी संचालनालयाची स्थापना करण्याची विनंती केंद्र शासनाच्या मा.कृषी मंत्री महोदयांनी राज्य शासनाच्या मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतीचे पुनरुज्जीवन करुन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राज्यात कृषी अभियांत्रिकी संचालनालयाची स्थापना करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) कृषि विभागाचा आकृतीबंध सूधारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. सुधारीत आकृतीबंधामध्ये कृषि अभियांत्रिकी संचालनालय स्थापण करण्याचे प्रस्तावित आहे.

कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम होईपर्यंत कृषि आयुक्तालयातील उपलब्ध कर्मचा-यांच्या सेवा तात्पूरत्या स्वरुपात घेवून कृषि अभियांत्रिकी संचालनायलाचे कामकाज सुरु करण्याबाबत आयुक्त(कृषि) यांना दिनांक२०.०६.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच, दिनांक१०.०७.२०२५ च्या आदेशान्वये, श्री. अंकूश माने यांना संचालक(कृषि अभियांत्रिकी संचालनालय), कृषि आयुक्तालय, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर येथे नवीन शासकीय घटक उद्यानविद्या महाविद्यालय स्थापनेबाबत

(३१) ५९८७ (२५-०४-२०२५). श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे तत्कालीन मा.कृषी मंत्री महोदयांचे आदेशान्वये १२२३२.५६ लक्ष आणि २७ शिक्षक वर्गीय व ५९ शिक्षकेत्तर कर्मचारी पदे अशा एकूण ८६ पदांसह विद्यापीठाच्या विधानपरिषद व कर्मचारी परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधीन राहून दिनांक ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मंत्री मंडळाच्या मान्यतेकरिता नवीन शासकीय घटक उद्यानविद्या महाविद्यालय स्थापनेचा प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव संचालक (शिक्षण) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे निर्देशान्वये कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी मा.उपसचिव (कृषी विद्यापीठे) कृषी व प.दु. विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे देण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :

(१), (२) व (३) होय,

(४) सदर प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. मात्र सदर प्रस्तावास नियोजन व वित्त विभागाने सहमती दर्शविलेली नाही.

याखेरीज, राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत नवीन महाविद्यालयांचे शासनावर लक्षणीय प्रमाणात दायित्व असल्याच्या पार्श्वभूमीवर हे दायित्व कमी होईपर्यंत नवीन महाविद्यालये स्थापन न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे शेलगाव (वां.) (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे केळी संशोधन केंद्र उभारण्याबाबत

(३२) ६०९१ (२५-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शेलगाव (वां.) (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे केळी संशोधन केंद्र, ऊती संवर्धन प्रयोगशाळा व केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून मागील अनेक वर्षापासून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात गट नं.२९६९ मध्ये १८.८५ हेक्टर तसेच कृषी विभागाची गट नं.५९४ मध्ये २०.१४ हेक्टर जमीन व पाणी उपलब्ध असून या ठिकाणी शासनाने केळी संशोधन केंद्र, ऊती संवर्धन प्रयोगशाळा व केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव मा.कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी व मा.महासंचालक, महाराष्ट्र कृषि व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये कृषी मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे (१०-०९-२०२५) : (१),(२) व (३) होय,

(४) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मौजे शेलगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर येथे कार्यरत कोरडवाहू पीक संशोधन केंद्र हे, कोरडवाहू पीकांवरील संशोधनाकरिता महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असल्याने, सदर संशोधन केंद्र हे राज्यासाठी महत्वपूर्ण संशोधन केंद्र आहे. त्यामुळे तेथील जमीन केळी संशोधन केंद्रासाठी उपलब्ध करुन देता येणे शक्य नसल्याचे अभिप्राय महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी दिले आहेत.

तसेच, शेलगाव, ता. करमाळा, जि.सोलापूर येथे कार्यरत असलेल्या कृषि विभागाच्या तालुका फळरोपवाटिकेच्या बीजगुणन केंद्र प्रक्षेत्रावर सुमारे ३४ ते ३५ वर्षे वयाचे मातृवृक्ष असल्याने, तेथील जागा देखील केळी संशोधन केंद्रासाठी उपलब्ध करुन देता येत नाही.

याखेरीज राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत नवीन महाविद्यालयांचे तसेच, संशोधन केंद्राचे शासनावर लक्षणीय प्रमाणात दायित्व असल्याच्या पार्श्वभूमीवर, हे दायित्व कमी होईपर्यंत, नवीन कृषि महाविद्यालय/संशोधन केंद्र स्थापन न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आश्रमशाळेत सहाय्यक अधिक्षक व अधिक्षिका पद निर्माण करण्याबाबत

(३३) ७०६१ (२८-०४-२०२५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळामध्ये अधिक्षक व अधिक्षिका पद हे सर्वात महत्त्वाचे आणि जबाबदारीचा घटक

म्हणून रात्रंदिवस कार्यरत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विभागाने सन २०१९ मध्ये अधिक्षक व अधिक्षिका यांच्या कामाचा ताण लक्षात घेता, नवीन आश्रमशाळा संहिता तयार करुन संहितेत सहाय्यक अधिक्षक व अधिक्षिका हे पद निर्माण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व आश्रमशाळेत सहाय्यक अधिक्षक व अधिक्षिका पद निर्माण केलेले नाही, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने प्रश्न बाब १ ते ३ नुसार चौकशी करुन प्रत्येक आश्रमशाळेत सहाय्यक अधिक्षक व अधिक्षिका निर्माण करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (२८-०७-२०२५) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

विभागामार्फत सन २०१९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या आश्रमशाळा संहितेत २०० विद्यार्थी संख्येसाठी १ अधिक्षक / अधिक्षिका व २०१ विद्यार्थी संख्येच्यापुढे १ सहायक अधिक्षक / अधिक्षिका मंजूर राहतील असे नमूद करण्यात आले आहे.

(३) आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाचा सुधारीत आकृतीबंध दिनांक १६.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. सदरहू सुधारीत आकृतीबंधानुसार ४९९ शासकीय आश्रमशाळेच्या वसतीगृहासाठी प्रत्येकी १ अधिक्षक (स्त्री), १ अधिक्षक (पुरुष) असे एकूण ९९८ पदे मंजूर करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेतंर्गत पाच जिल्हयातील तांडा वस्ती सुधार निधीला दिलेली स्थगिती

(३४) ७८९५ (०७-१०-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत इतर मागासवर्गीय विभागाच्या मंत्र्यांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये ७६ कोटी रुपयांपैकी परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, बुलढाणा या ५ जिल्हयातील ६० कोटी रुपयांच्या तांडा निधीला स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थगिती देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (१३-११-२०२५) : (१) व (२), वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत शासन निर्णय दिनांक ३१.०३.२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामांपैकी काही जिल्ह्यांतील कामांना स्थगिती देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींची निवेदने प्राप्त झाल्याने परभणी, नांदेड, हिंगोली, बीड आणि बुलढाणा या जिल्ह्यांतील एकूण रु.७२.२४ कोटी रक्कमेच्या ६४१ कामांना शासन पत्र दिनांक २४.०४.२०२५ अन्वये स्थगिती देण्यात आली होती.

(३) शासन निर्णय दिनांक २५.०८.२०२५ अन्वये परभणी, नांदेड, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांतील ५७८ कामे रद्द करण्यात आली असून त्यांऐवजी नवीन ३४२ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

येलदरी (जि.परभणी) जलविद्युत प्रकल्पावर पैठण विद्युत केंद्राच्या धर्तीवर उदंचन प्रकल्प उभारण्याबाबत

(३५) ७९१६ (०७-०८-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. २२ (23)

(१) परभणी जिल्ह्यातील येलदरी जलविद्युत प्रकल्पावर पैठण विद्युत केंद्राच्या धर्तीवर (जि.संभाजीनगर) उदंचन प्रकल्प (रिव्हर्सेबल टरबाईन) उभारण्याचा प्रस्ताव महानिर्मितीकडून तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०२५) : (१) हे खरे नाही.

सदर बाबतीत कोणताही प्रस्ताव महानिर्मिती कंपनीकडून तयार करण्यात आलेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात ग्रामीण भागातील ग्रंथालयांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा व निधीच्या वाढीबाबत

(३६) ८१०३ (२४-०७-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१२ पासून दोन हजारांहून अधिक ग्रंथालयांनी शासनाकडे मान्यतेसाठी अर्ज केलेले असून अद्याप त्यांना मान्यता न मिळाल्याने ती ग्रंथालये शासनाच्या अनुदानापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील शासनमान्य ग्रंथालयांमध्ये कार्यरत २१ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना शासनाच्या अनुदान वितरणात होणाऱ्या विलंबामुळे वेतनापासून वंचित राहावे लागत आहे तसेच त्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रलंबित मान्यता अर्ज, वाढीव अनुदान वितरण करण्यासाठी , कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे नियमितकरण व मानधन वाढ होणेबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, ग्रामीण भागातील ग्रंथालयांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा व निधी वाढीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०३-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक २२ मार्च, २०१३ व शासन निर्णय दिनांक ०७ जून, २०१४ अन्वये सन २०१२-१३ पासून नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देणे ही प्रक्रिया बंद आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतूदीनुसार शासनमान्य ग्रंथालयास सहाय्यक अनुदान देण्याची तरतूद आहे.

(२), (३) व (४) राज्यातील सर्व पात्र शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना सन २०२३-२४ च्या खर्चावर आधारित सन २०२४-२५ या वर्षाचे अनुदान दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीच्या आदेशान्वये वितरीत करण्यात आले आहे.

राज्यातील ११,१५५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये २०३३५ कर्मचारी आहेत. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये या नोंदणीकृत स्वायत्त संस्था असून महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम १९७० मधील तरतूदीनुसार नोंदणीकृत

सार्वजनिक ग्रंथालयांची व्यवस्था त्यांच्या विश्वस्तांकडून पाहीली जाते. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नसून त्यांना शासनाच्या एकत्रित निधीतून वेतन दिले जात नाही.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना पायाभूत सुविधा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने सहाय्यक अनुदाना व्यतिरिक्त आमदार-खासदार स्थानिक विकास कार्यक्रम, जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजना तसेच राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान व असमान निधी योजना अशा शासनाकडून विविध योजना राबविण्यात येतात.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्याचा तसेच सन २०१२ १३ पासून शासनमान्यता रद्द करण्यात आलेल्या अकार्यक्षम ग्रंथालयांऐवजी अन्य पात्र व्यवस्थापनाच्या ग्रंथालयांना विद्यमान निकषांनुसार सरसकट ड वर्गात शासनमान्यता देण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात या वर्षी भात खरेदीमध्ये घट झाल्याबाबत

(३७) ८२१९ (१८-०८-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात यावर्षी ६५ हजार ४२९.४७ क्विंटल भात खरेदी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी भात खरेदीमध्ये घट झाली असून १७ हजार ८५९.२४ क्विंटलची घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भात खरेदीत घट होण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (२५-०८-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८३१२८.८२ क्विंटल भात/धान खरेदी करण्यात आला होता. खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये ६५४२९.४७ क्विंटल भात/धान खरेदी करण्यात आला आहे. पणन हंगाम २०२३-२४ च्या तुलनेत पणन हंगाम २०२४-२५ मध्ये १७,६९९.३५ क्विंटल धान/भात खरेदीमध्ये घट झालेली आहे.

(३) खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये ४२ खरेदी केंद्रावर शासनाने दिलेल्या विहीत मुदतीत ४७०३ शेतकऱ्यांनी धान/भात विक्री करीता ऑनलाईन नोंदणी केली होती. ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ५९० शेतकऱ्यांनी शेड्युलिंग (Scheduling) करुन देखील शासकीय धान/भात खरेदी केंद्रावर धान विक्रीसाठी आणलेला नाही. त्यामुळे सदर ५९० शेतकऱ्यांकडील संभाव्य खरेदी होणारा ३४,९३५.४९ क्विंटल धान/भात खरेदी होऊ शकला नाही. त्यामुळे गत हंगामाच्या तुलनेत पणन हंगाम २०२४-२५ मध्ये १७,६९९.३५ क्विंटल धान कमी खरेदी झालेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील इस्माईल युसुफ महाविद्यालयाच्या आवारात वास्तव्यास असलेल्या कोरबु कुटुंबाच्या पुनर्वसनाबाबत

(३८) ८३१८ (१९-०८-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील शासकीय जमिनीवरील इस्माईल युसुफ महाविद्यालयाच्या आवारात सन १९१०-१९१५

पासून वास्तव्यास असलेल्या श्री.अस्लम यासीन कोरबु कुटुंबाच्या पुनर्वसनाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे दिनांक २१ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, इस्माईल युसुफ कॉलेजच्या स्थापनेपूर्वीपासूनच वसलेल्या या कुटुंबास महाविद्यालयाच्या संस्थापक ट्रस्टकडून सामावून घेण्याबाबत लेखी पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कुटुंबास महाविद्यालयाच्या स्थापनेपासून पाणी, वीज व अन्य मूलभूत सुविधा संबंधित शासकीय विभागांमार्फत पुरविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कुटुंब गेल्या ११० ते ११५ वर्षांपासून वास्तव्यास असूनही, त्यांचे पुनर्वसन अद्याप न झाल्याने या संदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२०-११-२०२५) : (१) इस्माईल युसूफ महाविद्यालयाकडे याबाबतचे कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही.

(२) दिनांक११.७.१९८८ रोजी सर मोहम्मद युसुफ ट्रस्टचे चेअरमन यांचे स्वीय सहाय्यक (P.A) यांनी प्राचार्य, इस्माईल युसुफ महाविदयालय यांना कोरबू कुटुंबाच्या पुनर्वसनाबाबत पत्र पाठविले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

श्री. यासीन कोरबू व त्यांचा पहिला मुलगा श्री. इरफान कोरबू हे महाविद्यालयात चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. त्यांनी सेवानिवृतीनंतर शासकीय निवासस्थान रिक्त केले आहे. परंतु त्यांचा दुसरा मुलगा श्री. असलम यासीन कोरबू हे कुठेही शासकीय सेवेत व महाविदयालयात कार्यरत नव्हते. ते वडिलांबरोबर (श्री. यासीन कोरबू) रहात असताना त्यांनी महाविदयालयाच्या शासकीय जागेवर अनधिकृत कच्चे बांधकाम करून तिथे राहत आहेत. त्याबाबत महाविदयालय प्रशासनाने वारंवार मनाई करून सुध्दा ते महाविदयालयातील वीज, पाणी तसेच शासकीय संसाधनाचा अनधिकृत रित्या वापर करत आहेत.

(४) श्री. असलम यासीन कोरबू यांनी महाविदयालयाच्या शासकीय जागेवर अनधिकृत खोलीचे बांधकाम केले आणि ती खोली संरक्षित करावी व सदर जागा नावावर करणेबाबत मा. शहर दिवाणी न्यायालय, दिडोंशी येथे सुट नं.२०६५/२०१५ दाखल केली, मात्र मा. न्यायालयाने दिनांक३१.७.२०१५ रोजी अंतिरिम दिलासा देण्याची विनंती मंजूर केली नसून सूट नं.२०६५/२०१५ सध्या न्यायप्रविष्ठ आहे. या निर्णयाला आव्हान देण्यासाठी श्री. असलम यासीन कोरबू यांनी २०१६ साली मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. २३०७६/२०१५ दाखल केली, मात्र ती सुध्दा मा. उच्च न्यायालयाने दिनांक २१.८.२०१८ रोजी फेटाळली व संबंधित खोलीला संरक्षण देण्याचे नाकारले. दिनांक१३.२.२०२० रोजी श्री. असलम कोरबू यांच्याकडे कोणतेही पुरावे नसल्यामुळे Notice of Motion १६८/२०१६ फेटाळली व पुन्हा पुराव्यासह सादर करण्यासाठी दिनांक१५.४.२०२० पर्यंत वेळ दिली.

तदनंतर श्री. असलम यासीन कोरबू यांनी पुन्हा नवीन पुरावे सादर करण्यासाठी कोर्टाला विनंती करून मा. शहर दिवाणी न्यायालय, दिडोंशी येथे Notice of Motion ३९८/२०२१ दाखल केली. सदर Notice of Motion ची सुनावणी सुरु आहे. सदर बाब ही शासकीय जागेत केलेल्या अनधिकृत बांधकाम व वास्तव्याशी निगडीत असून सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आल्याबाबत.

(३९) ९४५५ (०८-०९-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेंची विद्युत देयके काही महिन्यांपासून प्रलंबित असल्यामुळे ऐन परिक्षेच्या कालावधीत विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना ऐन परिक्षेच्या कालावधीत अभ्यासासाठी त्रास सहन करावा लागला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विकास विभागाकडे पुरेसा निधी उपलब्ध असताना नंदुरबार प्रकल्प कार्यालयाकडून विद्युत बिले भरण्याबाबत दिरंगाई झाली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यासाठी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (१३-१०-२०२५) :
(१) व (२) होय अंशत: खरे आहे.
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदूरबार अंतर्गत शासकीय प्राथमिक आश्रमशाळा ठाणेपाडा येथे दिनांक २८.०३.२०२५ रोजी विद्युत-पुरवठा खंडीत करण्यात आला होता. मात्र त्याच दिवशी विद्युत देयक अदा केल्याने विद्युत पुरवठा पुर्ववत सुरु करण्यात आला.त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधीत अभ्यासासाठी त्रास सहन करावा लागला नाही.
(३) मार्च २०२५ च्या अखेरीस आश्रमशाळा समूह योजनेतंर्गत अनुदान शिल्लक नव्हते. मात्र शालेय व्यवस्थापन समितीच्या उपलब्ध निधीतून विद्युत देयके अदा करण्यात आले आहे.
४) व ५) प्रश्न उद्‌भवत नाही.

शासकीय धान्याची वाहतूक शासकीय गोदामातून करण्याबाबत

(४०) ९४६५ (१८-०८-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अहिल्यानगर जिल्हाकरिता पुरवठा विभागामार्फत वाहतूक निविदा मंजूर करण्यात आली असून वाहतुकीबाबत मोठ्या प्रमाणावर अडचणी येत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थेट वाहतूक बंद करून ती पूर्वीप्रमाणेच करुन शासकीय धान्य गोदामातूनच होण्याची मागणी शासकीय गोदामात कार्यरत माथाडी कामगार, स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास सचिव (अन्न, नागरी व ग्राहक संरक्षण विभाग, म.रा.) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (३०-०९-२०२५) :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) थेट वाहतूकीबाबत येणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ बोर्डावर कायमस्वरूपी मुख्य कार्यकारी अधिकारी याची नियुक्ती करणेबाबत

(४१) ९८७१ (०८-०९-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ बोर्डाच्या मुख्यालयाला कायमस्वरूपी मुख्य कार्यकारी अधिकारी नसून, सध्या प्रभारी अधिकाऱ्यांमार्फतच कामकाज सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

वि.स. २२ (27)

(२) असल्यास, सद्यःस्थितीत प्रभारी सीईओ हे नियमित उपस्थित राहत नसून, दोन आठवड्यातून एकदा तासभर उपस्थित राहत असल्याने वक्फ संबंधित कामांसाठी आलेल्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वक्फ बोर्डासाठी पूर्णवेळ उप-सचिव दर्जाचा मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्त करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कायमस्वरूपी मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) :(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) उम्मीद अधिनियम २०२५ मधील सुधारित तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ या पदावर नियुक्ती करण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करुन इच्छूक अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले असून सदर पदावर नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

आदिवासी समाजातून इतर समाजामध्ये धर्मांतर करणाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे (ST) दाखले व वैधता प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत

(४२) ९८९४ (०८-०९-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ४५ अनुसूचित जमाती राहत असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात धर्मांतर करण्याचा प्रकार निदर्शनास आला असून यामध्ये जे आदिवासी अनुसूचित जमातीचे फायदे घेत आहेत तेच धर्मांतर करुन पुन्हा ख्रिश्चन मिशिनरीचे व मुस्लिम मदरशाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक व सामाजिक लाभ घेत असल्यामुळे राज्यातील आदिवासी समाजावर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जंगल, दऱ्या खोऱ्यात राहून शेती, मजुरी करणाऱ्या व आदिकाळापासून संस्कृती व परंपरा जपणाऱ्यांना फक्त आदिवासींना अनुसूचित जमातीचे (ST) आरक्षण देण्यात आले असून धर्मांतर करण्याचा प्रकारामुळे आदिवासी आरक्षणाची संकल्पनेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे आदिवासी संस्कृती व परंपरा कायम अबाधीत राहण्यासाठी धर्मांतर करुन सुद्धा वैद्यकीय अभियांत्रिकी, शासकीय योजनेचा फायदा, शासकीय अनुदान तसेच इतर शैक्षणिक व नोकरीमध्ये बेकायदेशीरपणे लाभ घेण्याऱ्या धर्मांतरित विद्यार्थी व नोकरदार यांची चौकशीकरीता समिती स्थापन करावी व या समितीमध्ये आदिवासी संस्थेच्या सदस्यांची नेमणूक करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच धर्मांतरित विद्यार्थी व नोकरदार यांची चौकशी करुन तत्काळ अनुसूचित जमातीचे दाखले व वैधता प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे, अन्यथा राज्यात धर्मांतर विरोधात आंदोलन करण्यात येईल, असे निवेदन आदिवासी समाजाने शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी समाजातून इतर समाजामध्ये धर्मातर करणाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे (ST) दाखले व वैधता प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (०१-१२-२०२५) : (१) व (२) सदर बाबी निदर्शनास आलेल्या नाहीत.

(३) सदर निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) होय.

(५) आदिवासी समाजाने धर्मांतर केल्यानंतर मिळणाऱ्या सोयी-सवलतीबाबत मुंबई राज्याने प्रसिद्ध केलेल्या कामगार आणि समाज कल्याण विभाग, निर्णय क्र CBC-१०५८-६, मुंबई दि १४ मे, १९५८ मध्ये "आदिवासी व्यक्तीने इसाई (Christianity), मुस्लीम (Islam) किंवा इतर कोणताही धर्म स्वीकारला तरी तो अर्जदार व्यक्ती आदिवासी म्हणून आदिवासी समाजासाठी असणा-या योजनांसाठी पात्र राहील असे नमूद आहे."

केंद्र शासनाच्या दिनांक ०२ मे, १९७५ च्या परिपत्रकान्वये जात प्रमाणपत्र देण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अनुसूचित जमातीच्या लोकांचा कोणताही धर्म असू शकतो असे स्पष्ट करण्यात आले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने स्टेट ऑफ केरला विरुध्द चंद्रमोहनन प्रकरणामध्ये, दिनांक २८ जानेवारी, २००४ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये धर्मांतर केलेल्या व्यक्तीला त्या अनुसूचित जमातीचा समजावे किंवा कसे हे प्रकरणपरत्वे अवलंबून आहे. तथापि त्यांने धर्मांतर केले तरी ती व्यक्ती त्या आदिवासी समाजाच्या रुढी व परंपराचे पालन करीत असल्याचे सिध्द होणे आवश्यक आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कारभारात पारदर्शकता व बळकटीकरण आणण्याबाबत

(४३) १०५८५ (०८-०९-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कारभारात पारदर्शकता व बळकटीकरण आणण्याच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी मा. उपमुख्यमंत्री, अल्पसंख्याक मंत्री, मुख्य सचिव व अल्पसंख्याक विभाग यांच्याकडे दिनांक ७ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निवेदन सादर करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रात नमूद करण्यात आलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) : (१) होय.

(२) निवेदनात नमुद मागण्यांच्या अनुषंगाने शासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यात समर्थन मुल्यावर धान खरेदी केन्द्र सुरु करणेबाबत

(४४) १२०६३ (१८-०८-२०२५). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) येथील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील धान कापणी व मळणी झाल्यानंतर धान विक्रीसाठी शासकीय आधारभूत सेवा सहकारी केंद्रावर नेऊन शेतकऱ्यांची फसवणूक, गैरप्रकार होत असल्याबाबतच्या तक्रारी उपविभागीय अधिकारी, तहलिदार, जिल्हा पणन अधिकारी, गोंदिया, तालुका सहाय्यक निबंधक यांना तेथील शेतकऱ्यांनी सन २०२४-२०२५ मध्ये केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारी/निवेदनात सेवा सहकारी संस्था रजिस्टर क्रमांक ५४२ अंतर्गत धान खरेदी केंद्रांवरील वाऊचर मशिनमध्ये तांत्रिक बिघाड असणे, धान्याचे मॉइश्चर १३ टक्के असतांना २५ टक्के दाखविणे, यामुळे ४० किलोच्या गोणीत ४ किलो जास्त धान्य घेणे अशाप्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील धानाची कापणी पूर्ण झाली असून शेतकऱ्यांनी

आपला माल विक्रीसाठी तयार ठेवला असून अद्यापर्यंत समर्थन मुल्यावर धान खरेदी झाली नसल्याचे माहे जून वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अवकाळी पावसामुळे कापलेल्या धान पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने धान खरेदी केन्द्र सुरु न झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१६-१०-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

मौजा हेटी व खामखुरा, ता. अर्जुनि-मोरगांव येथील २६ शेतकऱ्यांनी धान खरेदी केंद्रावर केंद्रचालक ऑनलाईन पावती देण्यास टाळाटाळ करत असल्याच्या केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार अर्जुनी-मोरगांव यांनी चौकशी केली असता संबंधित शेतकऱ्यांनी पावसामुळे धान खराब होवू नये म्हणून सहकारी संस्थेच्या गोदामात साठवणूक केला होता. शासनाकडून उद्दिष्ट प्राप्त झाल्यानंतर सदर धानाची खरेदी करुन त्याच्या ऑनलाईन पावत्या देण्यात याव्यात अशी शेतकऱ्यांची मागणी होती. त्यामुळे सदर धानाची वाढीव उद्दिष्टानुसार, प्रत्यक्ष खरेदी करुन शेतकऱ्यांना ऑनलाईन पावत्या देण्यात येतील. सदरच्या तक्रारीत शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारची फसवणुक झाल्याचे चौकशीत आढळुन आले नाही.
(२) हे खरे नाही.

सेवा सहकारी संस्था रजिस्टर क्रमांक ५४२ या संस्थेच्या धान खरेदी केंद्रावरील कामकाजाबाबत शासनाकडे अद्यायपपर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(३) हे खरे नाही.
गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाकडून ३९ खरेदी केंद्र व पणन महासंघाकडून १३ खरेदी केंद्र सुरु करण्यात आली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास विभागाकडून राज्यातील आश्रमशाळांमध्ये अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा अपात्र ठरविल्याबाबत

(४५) १२५६५ (०८-०९-२०२५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाकडून राज्यातील आश्रम शाळांमध्ये अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी काढण्यात आलेल्या १०५ कोटी रुपयांच्या खरेदी निविदेत नाफेड तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ या निमशासकीय संस्थांच्या निविदा अपात्र ठरविण्यात आल्याचे दिनांक १४ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रक्रिया संशयास्पद असल्याचा आरोप निमशासकीय संस्था नाफेड व पणन महासंघाने केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने निविदा अपात्र ठरविणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (१३-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

दापचरी (जि.पालघर) येथील दुग्ध प्रकल्प कार्यालयांतर्गत आस्थापनेवरील मजुरांची वाढीव वेतन व भत्ते देण्याबाबत

(४६) १३१८० (०६-१०-२०२५). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापचरी (जि.पालघर) येथील दुग्ध प्रकल्प कार्यालयांतर्गत प्रकल्प अधिकारी यांच्या आस्थापनेवरील मजुरांना सन २०११ पासून झालेली वेतन वाढ, सातव्या वेतन आयोग प्रमाणे झालेली वाढ, नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त मजुरांना व शासन निदेशानुसार सेवेतून कमी करण्यात आलेल्या मजुरांना उपदानाची जवळपास ९४ लाख ४९ हजार ७ रुपये इतकी रक्कम अद्यापपर्यंत अदा करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प अधिकारी दुग्ध प्रकल्प दापचरी यांच्या आस्थापनेवरील मजुरांना माहे ऑक्टोंबर, २०११ पासून झालेली वाढ सातव्या वेतन आयोगाप्रमाणे दैनिक भत्त्यात झालेली वाढ ६४ लाख ६ हजार २९१ रुपये अदा करणे आवश्यक असताना ती आजतागायत संबंधित मजुरांना मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त मजुरांना व शासन निर्देशाने सेवेतून कमी करण्यात आलेल्या मजुरांना उपदानाची रक्कम ३० लाख ४२ हजार ७१६ रुपये आजतागायत अदा करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मजुरांकडून वारंवार आपल्या मेहनतीच्या व हक्काच्या पैशाची मागणी संबंधित अधिकारी यांच्याकडे केली असता अधिकाऱ्यांकडून सदर निधी शासनाकडे प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यांच्या हक्काचे पैसे तात्काळ मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (०३-१२-२०२५) : (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

(५) दापचरी (जि.पालघर) येथील दुग्ध प्रकल्प कार्यालयांतर्गत आस्थापनेवरील मजुरांची वाढीव वेतन व भत्ते अदा करण्याची बाब विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे चंदूर (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) गावातील पुरग्रस्त नागरीकांना पावसाळ्यापूर्वी स्थलांतरीत करणेबाबत

(४७) १३२३९ (०८-०९-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) : सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चंदूर (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे मागील सन २०१९, २०२१ आणि २०२३ यावर्षी आलेल्या महापूराने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षीच्या पावसाळ्यापूर्वी उक्त गावातील पुरग्रस्त नागरिकांना स्थलांतरीत करणे व निवारा शेडचे बांधकाम करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आपत्ती व्यवस्थापन मंत्री यांचेकडे दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (१८-११-२०२५) :

वि.स. २२ (31)

(१) होय, हे खरे आहे. सन २०१९,२०२१ मध्ये आलेल्या महापूराने नागरिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. परंतु २०२३ मध्ये आलेल्या पुरामुळे नागरिकांचे अंशत: नुकसान झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे चंदूर (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील पूरग्रस्त लोकांसाठी निवारा शेड बांधकाम करण्याचा रु. ९९९.७९ लक्ष इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सादर केला आहे. सदर काम प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष, निधी उपलब्धतेच्या अधीन राहून करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील रेशन वितरण करणाऱ्या दुकानदारांचे थकीत कमिशन अदा करण्याबाबत

(४८) १३३१६ (१८-०८-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)नागपूर शहरात अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय अंतर्गत दर महिन्याला चार लाखांपेक्षा जास्त कुटुंबियांना रेशन वितरण करण्याची जबाबदारी असलेल्या ६८३ दुकानदारांना गत ५ महिन्यांपासून कमिशन मिळाले नसल्याची बाब दिनांक २९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित दुकानदारांना गत ५ महिन्यांपासून कमिशन मिळाले नसल्याने विजेचे देयक, दुकानातील नोकरांचा पगार, दुकानाचे भाडे यांसाठी कर्ज घेण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर शहरातील रेशन वितरण करण्याची जबाबदारी असलेल्या ६८३ दुकानदारांचे थकीत कमिशन तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (२८-१०-२०२५) : (१), (२) व (३) नागपूर शहरातील एकूण ६८० रास्त भाव दुकानदारांना मार्च, २०२५ ते जुन, २०२५ पर्यंत एकूण ₹१,९४,३७,८४०/- इतका निधी मार्जिन अदा करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) ची अंमलबजावणी सिंगल नोडल एजन्सी (SNA) प्रणालीवरून SNA-SPARSH प्रणालीमध्ये (Scheme Performance Accountability, Reporting and System for Holistic Implementation) रूपांतरित होणार आहे. त्यानुसार, पब्लिक फायनान्स मॅनेजमेंट सिस्टिम (PFMS) प्रणालीवर राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत नोंदणीकृत असलेल्या सर्व विक्रेत्यांच्या बँक खात्याच्या तपशिलाची पडताळणी करण्याच्या सूचनेनुसार, सदर पडताळणीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

तथापि, काही रास्तभाव दुकानदारांकडून विहित वेळेत आवश्यक माहिती प्राप्त न झाल्यामुळे, अशा दुकानदारांची विक्रेता नोंदणी (Vendor Registration) आणि मंजुरी (Approval) देण्याची कार्यवाही प्रलंबित राहिली आहे.

राज्यात रेशनच्या गव्हाचा काळाबाजार होत असल्याबाबत

(४९) १४१२८ (१८-०८-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयासह राज्यात स्वस्त धान्य दुकानांत होणा-या गहू पुरवठयात मोठया प्रमाणात काळाबाजार सुरु झाला असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेशन गव्हाचा वापर हॉटेल, ढाबे, शिवभोजन थाळी याठिकाणी होताना दिसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रेशनगव्हाचा काळाबाजार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली

आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (२८-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

चामोर्शी (जि.गडचिरोली) खरेदी विक्री महासंघात धानाच्या बोगस वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

(५०) १४४०८ (१८-०८-२०२५). डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी खरेदी विक्री महासंघात बोगस धानाच्या वाटपात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१६-१०-२०२५) : (१) खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये चामोर्शी खरेदी विक्री संघामार्फत १६,२०८ शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली आहे. त्यापैकी १४,९९५ शेतकऱ्यांना माहे सप्टेंबर, २०२५ अखेर ३६.१८ कोटी वितरीत करण्यात आले आहेत. उर्वरीत शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर राशीची रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन : **जितेंद्र भोळे**
नागपूर. **सचिव-१,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.